**<u>रे. दि. मु. नं. २७३/२०१४ मधील निशाणी क्र. ७४ चे अर्जावरील आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज त्रयस्थ इसम सुरेश निंगाप्पा बिराजदार, रा. काराजनगी, ता. जत, जि. सांगली याचेतर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० (२) अन्वये त्याला प्रतिवादी म्हणून प्रस्तुत दाव्यात आवश्यक पक्षकार समाविष्ट करण्याकरिता दाखल केला आहे. वादीतर्फे प्रस्तुत अर्जास त्याचे म्हणणे निशाणी क्र. ८० कडे दाखल केले आहे. प्रतिवादीला पुरेशी संधी देऊनही त्याने त्याचे म्हणणे मुदतीत दाखल केले नाही. म्हणून त्याच्याविरुद्ध दि. १५/०६/२०२३ रोजी विना म्हणणेचा आदेश पारित करण्यात आला.

२) प्रस्तुत अर्जात त्रयस्थ इसमातर्फे असे कथन करण्यात आले आहे की, वादी व प्रतिवादी हे त्याचे सख्खे भाऊ आहेत. दावा मिळकत मौजे भिवर्गी, ता. जत, जि. सांगली येथील जमीन स.नं. ६१/१ क्षेत्र हे. ५=०४ आर आकार रू. १०=५५ पैसे ही जमीन वादी व प्रतिवादी यांच्या नावे नोंद आहे. सदर जमिनीतील वादीचा हिस्सा त्याला खरेदी देणेचा तोंडी करार दि. १६/०७/२०१३ रोजी झाला. त्यावेळी वादीने त्याला खरेदी देण्याचे कबूल केले. परंतु नंतर ते नाकारल्याने त्याने वादीविरुद्ध ठरल्याप्रमाणे खरेदीपत्र करून मिळण्याकरिता सांगली येथील मे. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर यांचे न्यायालयात स्पेशल दिवाणी मुकदमा क्र. ९९/२०१६ दाखल केला आहे व त्यामध्ये यातील प्रतिवादी हा त्या दाव्यात प्रतिवादी क्र. २ असून तो प्रलंबित आहे. तिऱ्हाईत इसमाने केलेल्या दाव्यातील व प्रस्तुत दाव्यातील वादी, प्रतिवादी व दावा मिळकत एकच आहे. या कारणाने प्रस्तुत दाव्यात त्याचाही वर नमूद केल्याप्रमाणे हितसंबंध आहे. तरी सदर कामी त्याला प्रतिवादी म्हणून सामील करावे यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. तिऱ्हाईत इसमाने सांगली येथील मे. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर यांचे न्यायालयात

केलेला स्पेशल दिवाणी मुकदमा क्र. ९९/२०१६ व जत येथील न्यायालयातील सदर रे.दि.मु. क्र. २७३/२०१४ यांचे निकाल एकत्र होणे न्यायाचे दृष्टीने गरजेचे आहे. या कारणानेही प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. त्यामुळे दाव्याची बहुविधता टाळता येणार आहे. तिऱ्हाईत इसमाने केलेला दावा प्रलंबित असल्याने व हा ही दावा प्रलंबित असल्याने प्रस्तुतचा अर्ज मे. न्यायालयात दाखल केला आहे. सबब, प्रस्तुत दाव्यात त्रयस्थ इसमास याकामी प्रतिवादी क्र. २ म्हणून सामील करून त्याला त्याचे म्हणणे देण्याची संधी देण्यात यावी अशी विनंती त्रयस्थ इसमाने केली आहे.

३) वादीतर्फे प्रस्तुत अर्जास विरोध दर्शवून असे प्रतिकथन केले आहे की, प्रस्तुतचा अर्ज खोटा, लबाडीचा व पश्चात बुद्धीने दिला असून तो कायद्याने चालण्यास पात्र नाही. केवळ वादीच्या दाव्यात विघ्न आणावे व त्यास त्वरित न्याय मिळू नये या हेतूने सदरचा अर्ज दिला आहे. वादीने तथाकथित तोंडी करारावरून सांगली येथील न्यायालयात स्पे.दि.मु. क्र. ९९/२०१६ चा दावा दाखल केला आहे. सदर दाव्याची प्रतही या दाव्याचे कामी दाखल केली आहे. त्यातील कथन पाहता डिसेंबर २०१५ मध्ये वादीने तोंडी करार नाकारला म्हणून एप्रिल २०१६ मध्ये स्पे.दि.मु. क्र. ९९/२०१६ दाखल केला. वादीचा प्रस्तुतचा दावा व त्याची माहिती अर्जदारास होती हे सांगली येथील दाव्यामधील कथनावरून स्पष्ट दिसते. त्याचवेळी अर्जदाराने याकामी अशा स्वरूपाचा अर्ज देणे त्याच्या दृष्टीने जरुरीचे होते. दावा दाखल तारखेनंतर ८–१० वर्षांनी अशा स्वरूपाचा अर्ज दाखल करून या दाव्यामध्ये विघ्न आणावयाचे हा अर्जदाराचा दुष्ट हेतू स्पष्ट दिसतो. या अर्जामध्ये अशा स्वरूपाची प्रतिवादी म्हणून सामील होण्याची मागणी त्याने यापूर्वीच का केली नाही याचे स्पष्टीकरण अर्जामध्ये दिले नाही. यावरूनही अर्जदाराची लबाडी समजून येईल. प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी व अर्जदार यांचे संगनमत आहे. इतर भावांचीही त्याला साथ आहे. वादीस मूलबाळ नसल्याने त्याची

जमीन हडप करावी असा इतर भावांचा डाव आहे. या दाव्यामध्ये अर्जदारास सामील केल्यास कोणताच फरक पडणार नाही. कारण सांगली येथील दाव्यामध्ये अर्जदारास यश आल्यास व त्याहीवेळी कराराची पूर्तता करून घेऊ शकतो. उलट या दाव्यामध्ये वादीस यश आल्यास कराराची पूर्तता करणे जास्त सोईचे होणार आहे. दाव्यात अपयश आले तरीही अर्जदार कराराची पूर्तता करून घेऊ शकतो याची पूर्ण जाणीव अर्जदार व प्रतिवादींना आहे. परंतु या दाव्यामध्ये विघ्न आणावे, वादीची बाजू बळकट आहे त्यामुळे त्याला लवकर यश प्राप्त होऊ नये हा अर्जदार व प्रतिवादीचा संगनमताचा डाव आहे. अर्जदाराला असा अर्ज करण्याचा कायद्याने हक्कच नाही. मे. न्यायालय मर्जीनुरूप अर्जाचा गुणदोषावर विचार करू शकते. त्यामुळे अर्जाची मागणी पाहता दाव्यात गुंतागुंत निर्माण होऊन दाव्याचा निकाल लांबणीवर पडू शकतो. यामुळे न्यायास विलंब म्हणजे न्याय नाकारणे या मूळ तत्त्वास बाधा येत आहे. वरील बाबींचा विचार करता अर्जदाराचा अर्ज खर्चासह फेटाळून देण्यात यावा व विनाकारण अर्ज दाखल करून दाव्याच्या सुनावणीस व्यत्यय आणून विलंबास कारणीभूत ठरलेबाबत अर्जदारास मोठा दंड करावा अशी विनंती वादीतर्फे करण्यात आली आहे.

४) अर्ज व म्हणणे वाचले. संचिकेचे व सोबतच्या कागदपत्रांचे अवलोकन केले. उभय पक्षकारांच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

५) उभय पक्षकारांतर्फे करण्यात आलेली परस्पर विरोधी कथने, अभिलेखावर या टप्प्यापर्यंत दाखल असलेली कागदपत्रे व सादर केलेला युक्तिवाद यांचे पार्श्वभूमीवर प्रस्तुत अर्जाचे निर्णयाचे अनुषंगाने विचार केला असता खालील प्रश्नबिंदू माझे विचारार्थ उपस्थित झाले. त्यावरील माझे निष्कर्ष त्यांच्या अनुषंगाने असणाऱ्या सविस्तर कारणमीमांसेसह मी खालीलप्रमाणे नमूद करीत आहे.

| अ.क्र. | प्रश्नबिंदू | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | त्रयस्थ इसमाने विनंती केल्याप्रमाणे मूळ दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार म्हणून त्याला प्रतिवादी म्हणून सामील करण्यास परवानगी मिळणेसाठी तो पात्र आहे काय ? | **नकारार्थी** |
| २. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

*** कारणमीमांसा ***

६) त्रयस्थ पक्षकारातर्फे विद्वान विधिज्ञ श्री. व्ही. एन. गुडोदिनी यांनी असा युक्तिवाद केला की, त्रयस्थ इसम हा वादी व प्रतिवादी यांचा रक्तसंबंधातील नातेवाईक आहे. वादी हा त्याच्या हिश्याची मिळकत त्रयस्थ इसमास विक्री करण्याचा तोंडी करार केला असून त्याची पूर्तता होऊन मिळण्यासाठी त्रयस्थ इसमाने दाखल केलेला दावा प्रलंबित आहे. प्रस्तुत दाव्यातील वादविषय मिळकत ही वादी व प्रतिवादी यांची वडिलोपार्जित मिळकत आहे. त्यामुळे प्रस्तुत त्रयस्थ इसमास सदर दावा मिळकतीमध्ये हक्क व हितसंबंध प्राप्त झालेले आहेत. त्यामुळे त्रयस्थ इसमास प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी म्हणून सामील करून घेऊन त्याला त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देणे न्यायाचे व गरजेचे आहे. तशी संधी दिल्यास वादी व प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान संभवत नाही. याउलट तशी संधी त्याला न दिल्यास त्याला त्याचे न्यायहक्कांपासून वंचित रहावे लागणार आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे.

७) वादीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. एस. डी. आष्टेकर यांनी असा युक्तिवाद केला की, त्रयस्थ इसमास त्याने दाखल केलेल्या व प्रस्तुतच्या दाव्याची माहिती सन २०१४ पासून असूनही त्याने प्रस्तुतचा अर्ज मुद्दाम खोडसाळपणे प्रस्तुत दाव्याचे कामी विलंब

करण्यासाठी सादर केला आहे. त्याचबरोबर त्रयस्थ इसमाने वादीविरुद्ध दाखल केलेला दावा हा केवळ तथाकथित तोंडी करारपत्रावर आधारित असून त्या दाव्याचे कामी त्याचा गुणदोषावर निर्णय होणार आहे. वादीने दाखल केलेला प्रस्तुतचा दावा व त्रयस्थ पक्षकाराने दाखल केलेला दावा यामध्ये मागणी करण्यात आलेल्या दादी या भिन्न स्वरूपाच्या आहेत. त्रयस्थ पक्षकाराने दाखल केलेल्या दाव्यात त्याला यश आल्यास त्याच्या लाभातील तथाकथित कराराची पूर्तता करून घेण्याची संधी त्याला लाभणार आहे. त्यामुळे या दाव्यामध्ये त्याच्या उपस्थितीची आवश्यकता नाही. तो या दाव्यामध्ये आवश्यक अथवा योग्य असा पक्षकार नाही. त्यामुळे त्याचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र नाही.

८) उभय पक्षकारांचे परस्परविरोधी कथनांचे पार्श्वभूमीवर या अर्जाचे निर्णयाकरिता त्रयस्थ इसमाने विनंती केल्याप्रमाणे त्याला या दाव्यामध्ये समाविष्ट करण्याची परवानगी देण्यासाठी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० मधील तरतुदीप्रमाणे तो या दावेचे कामी आवश्यक वा योग्य पक्षकार आहे किंवा कसे हे त्याने दर्शवून दिले आहे काय हे पाहणे जरुरीचे आहे. सदरच्या कायदेशीर तरतुदीचा विचार करून प्रस्तुत अर्जाचा निर्णय करणेकामी परस्परविरोधी कथनांची तपासणी करणे जरुरीचे आहे. त्याअनुषंगाने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम ३ मध्ये एखाद्या पक्षकारास प्रतिवादी म्हणून सामील करण्यासाठीची तत्त्वे नमूद करण्यात आली आहेत. सदरचा नियम स्पष्टतेकरिता खाली उद्धृत केला आहे.

**O. 1 Rule 3 (a) & (b) of C.P.C.**

All persons may be joined in one suit as defendants where-

a) any right to relief in respect of, or arising out of, the same act or transaction or series of acts or transaction is

alleged to exist against such persons, whether jointly, severally or in the alternative; and

b) if separate suit brought against such persons, any commons question of law or fact would arise.

९) सदरच्या तरतुदीचा विचार केला असता त्रयस्थ इसमाने प्रस्तुतचा अर्ज केवळ त्याने या दाव्यातील वादीविरुद्ध तोंडी कराराची पूर्तता होऊन मिळण्यासाठी मा. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, सांगली यांचे न्यायालयात स्पे.दि.मु. क्र. ९९/२०१६ चा दावा दाखल केला असून त्या दाव्यातील दावा मिळकत व प्रस्तुत दाव्यातील दावा मिळकत आणि पक्षकार एकच असल्यामुळे त्यास या दाव्याचे कामी प्रतिवादी म्हणून सामील करून घेण्याची विनंती केली आहे. तथापि, वादीने दाखल केलेला प्रस्तुतचा दावा हा त्याचा भाऊ प्रतिवादी सिदगोंडा बिराजदार याच्या विरोधात दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप होऊन मिळण्याकरिता व त्याचे हिश्याचे मिळकतीचा पृथक कब्जा मिळण्यासाठी दाखल केला आहे. वादीने दाखल केलेल्या संपूर्ण दाव्याचे अवलोकन केले असता त्याने प्रस्तुत त्रयस्थ पक्षकाराविरुद्ध दाव्याचे कारण उद्भवले असल्याचे कोठेही कथन केलेले नाही. त्यामुळे माझे असे मत आहे की, वर नमूद तरतुदीमध्ये समाविष्ट केलेल्या कोणत्याही अटी प्रस्तुत त्रयस्थ पक्षकारास दाव्याचे कामी प्रतिवादी म्हणून सामील करण्यासाठी पूर्ण होत नाहीत.

१०) त्रयस्थ पक्षकाराने प्रस्तुत अर्जाबाबत त्याला दाव्यात प्रतिवादी म्हणून सामील करण्यात यावे अशी देखील विनंती केली आहे. त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० (२) अन्वये त्यांनी प्रस्तुतच्या दाव्यात ते आवश्यक अथवा योग्य पक्षकार असल्याचे दर्शवून देणे जरुरीचे आहे. सदरचा नियम हा न्यायालयास एखाद्या व्यक्तीस स्वतःहून अथवा सदर व्यक्तीच्या अर्जावरून दाव्यामध्ये पक्षकार म्हणून सामील करण्याचा अधिकार बहाल करतो. अधिक स्पष्टतेसाठी सदरचा नियम देखील खाली उद्धृत करण्यात

आला आहे.

> **<u>O. 1 R 10 (2) of C.P.C.</u>**
> i) The necessary party is one, whose presence is indispensable to the constitution of the suit, against whom the relief is sought and without whom no effective order can be passed.
>
> ii) The proper party is one, in whose absence an effective order can be passed, but whose presence is necessary for the complete and final decision on the question involved in the proceeding.

११) सदर तरतुदीचे अनुषंगाने प्रस्तुत दाव्याचा विचार केला असता वादीने प्रस्तुत दाव्यात सध्या समाविष्ट असलेल्या प्रतिवादीविरुद्ध दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप होऊन तिचा पृथक कब्जा मिळण्यासाठीची म्हणून दाद मागितली आहे. तशा स्वरूपाचा अंतिम आदेश दाव्याच्या संपरिक्षेअंती गुणदोषावर त्रयस्थ पक्षकाराच्या उपस्थिती शिवाय पारित करता येऊ शकतो. त्यासाठी त्रयस्थ पक्षकाराच्या उपस्थितीची कोणत्याही प्रकारे आवश्यकता नाही. सदर बाबीचा विचार करू माझे असे मत आहे की, त्रयस्थ पक्षकार हा प्रस्तुतच्या दाव्यात आवश्यक पक्षकार होत नाहीत.

१२) त्रयस्थ पक्षकार हा प्रस्तुतच्या दाव्यात योग्य पक्षकार आहे किंवा कसे या प्रश्नाच्या अनुषंगाने विचार केला असता ही बाब प्रामुख्याने नमूद करणे जरुरीचे आहे की, त्यांची उपस्थिती प्रस्तुत दाव्याच्या संपरिक्षेमध्ये अंतर्भूत असलेले प्रश्न पूर्णतः व अंतिमतः निर्णित करण्यासाठी आवश्यक आहे काय? सदरच्या पार्श्वभूमीवर विचार केला असता प्रस्तुत दाव्याच्या संपरिक्षेमध्ये वादी हा प्रतिवादीकडून दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप होऊन तिचा पृथक कब्जा मिळण्यासाठी पात्र आहे किंवा कसे हे प्रश्न व मुद्दे समाविष्ट आहेत. सदरच्या मुद्यांच्या पूर्णतः व अंतिमतः गुणदोषावर निर्णयासाठी वादीने दावा मिळकत ही एकत्र कुटुंबाची वडिलोपार्जित अविभक्त मिळकत असल्याचे व

तिच्यामध्ये वाटप होऊन मिळण्यास तो पात्र असल्याचे दर्शवून देणे जरुरीचे आहे. सदर दादींचा व मुद्यांचा विचार केला असता वादी हा केवळ प्रतिवादीविरुद्ध दाद मागत असून त्याने अन्य कोणाविरुद्धही कोणत्याही स्वरूपाची दाद मागितलेली नाही. सबब, सदर बाबीचा विचार केला असता माझे असे मत आहे की, त्रयस्थ पक्षकार हा प्रस्तुत दाव्यात ना आवश्यक पक्षकार आहे ना योग्य पक्षकार आहे. केवळ प्रस्तुत त्रयस्थ इसमाने वादीविरुद्ध तोंडी कराराची पूर्तता होऊन मिळण्यासाठी दाखल केलेला दावा प्रलंबित आहे एवढ्याच कारणावरून वादीने त्याच्याविरुद्ध कोणतीही दाद मागितली नसताना दाव्याच्या स्वरूपाचा विचार केला असता त्याला प्रतिवादी म्हणून सामील करणे न्यायाचे व जरुरीचे नाही असे माझे मत आहे.

१३) त्रयस्थ पक्षकाराने त्याचा दावा प्रलंबित असल्याबाबत जे कथन केले आहे त्याचा विचार केला असता त्या दाव्याच्या संपरिक्षेकामी विचारात घ्यावयाचे मुद्दे हे प्रस्तुत दाव्याच्या मुद्यांशी संबंधित नसून त्या दाव्याची संपरिक्षा स्वतंत्रपणे सक्षम न्यायालयासमोर पूर्ण होऊन त्या दाव्याचा गुणदोषावर निर्णय होण्यास या दाव्याचा कोणताही अडथळा होणार नाही. प्रस्तुतच्या दाव्यात निशाणी क्र. २४ कडे वादी व प्रतिवादीची परस्पर कथने विचारात घेऊन मुद्दे देखील विरचित केले आहे. सदर मुद्यांचे आधारे पुराव्याची जबाबदारी केवळ वादीवर ठेवण्यात आली असून वादीने सदरचे मुद्दे शाबीत केले तरच तो त्याने मागितलेल्या दादी मिळण्यास पात्र होऊ शकेल. सदरच्या बाबीचा विचार केला असता प्रस्तुत दाव्याच्या संपरिक्षेची व्याप्ती ही मर्यादित असून त्याच्या पूर्णतः व अंतिमतः गुणदोषावर निर्णयासाठी त्रयस्थ पक्षकाराच्या उपस्थितीची कोणतीही आवश्यकता नाही असे माझे मत आहे. वरील सर्व कारणांचा विचार केला असता त्रयस्थ पक्षकाराची त्यास या दाव्यात प्रतिवादी म्हणून सामील करून घेण्याची विनंती मंजूर होण्यास पात्र नाही. सबब, मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

१. प्रस्तुतचा अर्ज निशाणी क्र. ७४ नामंजूर करण्यात येत आहे.

२. त्रयस्थ पक्षकार, वादी व प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जाचा आपापला खर्च सोसण्याचा आहे.

EKNATH KOYAPPA CHOUGALE
Digitally signed by EKNATH KOYAPPA CHOUGALE
Date: 2023.09.26 12:22:02 +0530

स्थळ:– जत
दि. ०७/०९/२०२३

(एकनाथ को. चौगले)
(JO Code -MHSN2400)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
जत

## <u>प्रमाणपत्र</u>

मी असे प्रमाणित करतो की, या पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर व मूळ आदेशामधील मजकूर हा एकसारखा आहे.

| | |
|---|---|
| स्टेनोग्राफरचे नांव | श्री. एस. ए. जमादार (लघुलेखक श्रेणी–III) |
| कोर्टाचे नांव | श्री. एकनाथ को. चौगले.<br>दिवाणी न्यायाधीश क.स्तर व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, जत. |
| दिनांक | ०७/०९/२०२३ |
| पीठासीन अधिकारी यांनी सही केलेली तारीख | १४/०९/२०२३ |
| आदेश अपलोड केलेली तारीख | २७/०९/२०२३ |